# भाषा आणि वाणीचा विकासाबद्दल




भाषा आणि वाणी (बोलणे) संभाषणासाठी खूप महत्वाचे आहेत.मुलांच्या बोलण्याच्या क्षमतेनुसार आपल्याला त्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत माहिती मिळू शकते. सुरुवातीला अस्पष्ट उच्चार (**babbling**), दोन अक्षरी शब्द जसे 'मामा, बाबा, दादा ' आणि दोन शब्दाचे वाक्य करता येणे हे अनुक्रमे बोलण्याच्या विकासाचे टप्पे आहेत

## संभाषणाचे दोन प्रकार

१.**आकलन (रिसेप्टिव्ह)** - एखाद्याला बोललेले समजणे आणि त्याचे आकलन होऊन त्यावर प्रतिक्रिया देणे, जसे बाळाला हाक मारल्यावर बाळाने तुमच्याकडे वळून बघणे हा संभाषणाचा एक प्रकार आहे




२.**सूचक (एक्सप्रेसिव्ह)** - व्यक्ती जेव्हा त्याचा आवाज, शब्द, खुणा वापरून किंवा लिहून संभाषण करते त्या प्रकाराला सूचक संभाषण म्हणतात. त्यामध्ये बाळ अगदी सुरुवातीला रडून, अस्पष्ट बडबड किंवा हातवारे करून सूचक संभाषण साधत (एक्सप्रेस करत असते) असते.



## वाणी आणि भाषेच्या विकासात कशामुळे समस्या येऊ शकतात?

कानाच्या समस्या जसे कमी ऐकू येणे, बहिरेपणा, किंवा निर्धारित वेळेआधी बाळाचा जन्म (प्री टर्म), सेरिब्रल पॉल्सी (CEREBRAL PALSY) , स्वमग्नता (ऑटीझम) या कारणांमुळे देखील भाषेच्या विकासात अडथळे येऊ शकतात. त्यामुळे बाळाच्या बोलण्याच्या प्रगतीकडे लक्ष्य द्या जेणेकरून जर काही समस्या असतील तर त्या लवकर समजल्याने बाळाला वेळेवर योग्य उपचार मिळून त्यांचे निराकरण होईल.




**Unnati Pediatric Rehabilitation Center, Warje, Pune Email- unnatiprc@gmail.com Contact- +91 9561879749**

Unnati
PEDIATRIC REHABILITATION CENTER
Building Up Milestone

# बोलण्याच्या विकासाचे टप्पे खालीलप्रमाणे –

| | भाषा आणि वाणी | ऐकण्याची क्षमता आणि समज |
|---|---|---|
| ३ महिन्यांपर्यंत | बाळाशी बोलत असताना त्याने तुमच्याकडे बघणे<br>भूक लागल्यावर किंवा झोप आल्यावर रडून सांगणे/ रडणे<br>कुई करणे किंवा हसणे | आवाजाच्या दिशेने वळून बघणे<br>आवाज ऐकून शांत होणे किंवा हसणे<br>चेहऱ्याकडे कुतूहलाने बघणे |
| ६ महिन्यांपर्यंत | एक अक्षरी शब्द बडबडणे (दा दादा)<br>भावना व्यक्त करण्यासाठी वेगळे आवाज काढणे<br>स्वतःकडे लक्ष्य वेधून घेण्यासाठी अस्पष्ट बडबड करणे | बोलणे ऐकून त्यावर प्रतिसाद देणे<br>अचानक होणाऱ्या आवाजांवर प्रतिक्रिया देणे<br>वाजणाऱ्या खेळण्यांकडे बघणे |
| ९ महिन्यांपर्यंत | आवाजाची नक्कल करणे<br>वेगवेगळे आवाज आणि जास्त अक्षरांचे शब्द एकत्र करून बोलायचे प्रमाण वाढणे समोरासमोर संवाद साधण्याचा प्रयत्न करणे | बाळाला हाक मारल्याचे कळते<br>ओळखीच्या व्यक्ती आणि वस्तुंची नावे सांगितल्यावर त्यांच्याकडे बघणे बाळाला त्याच्याशी हावभावात्मक बोललेले कळते आणि ते त्यावर प्रतिसाद देते |
| १२ महिन्यांपर्यंत | मामा किंवा दादा उच्चारणे हे अर्थपूर्ण असतेबोलण्याची नक्कल करते<br>बाळाच्या बडबडण्याच्या पद्धतीत बोलण्याचे प्रयत्न दिसू लागतात | काही गोष्टींसाठी मनाई केल्यावर त्यावर प्रतिसाद देणे<br>बाळाला बोलावल्यावर त्या दिशेला यायचा प्रयत्न करते<br>खूण केलेल्या किंवा तुम्ही पाहत असलेल्या दिशेला ते |
| १५ महिन्यांपर्यंत | ५ ते १० शब्द उच्चारू शकते सोपे शब्द आणि हातवारे यांची नक्कल करते<br>हावभाव आणि आवाज जमवून त्याप्रमाणे प्रतिसाद देते | सोप्या सूचनांचे अर्थ समजून त्याप्रमाणे वागते<br>चित्रांकडे निरखून बघते<br>१ ते २ अवयव ओळखते |

| | भाषा आणि वाणी | ऐकण्याची क्षमता आणि समज |
|---|---|---|
| १८ महिन्यांपर्यंत | दुसऱ्या संभाषणातील शब्द ऐकून स्वतः ते उच्चारण्याचा प्रयत्न करते<br>विचारलेल्या प्रश्नांना प्रतिसाद देते<br>स्पष्ट बोलण्याचा प्रयत्न वाढतो | चित्रातल्या ओळखीच्या व्यक्ती आणि वस्तुंकडे इशारा करते<br>आत , बाहेर, वर या शब्दांचा अर्थ कळतो<br>हो किंवा नाहीच्या प्रश्नांना डोकं हलवून उत्तर देते |
| २१ महिन्यांपर्यंत | कमीतकमी ५० शब्द वापरू शकते<br>सातत्याने नवीन शब्द शिकण्याचा प्रयत्न करणे<br>चित्रे आणि वस्तूंची नावे सांगतो | सर्वनाम, जसे मी, तू, माझे यांचा अर्थ समजतात<br>नवीन शब्द लवकर समजतात<br>विचारल्यावर ३ ते ५ अवयव ओळखतात |
| २४ महिन्यांपर्यंत | काल्पनिक खेळ खेळताना हावभाव आणि शब्दांचा वापर करतो<br>२ शब्दांच्या वाक्यात बोलते | कृती दर्शवण्यासाठी वापरलेल्या शब्दांचे अर्थ कळतात.<br>सांगितलेल्या २ कृती क्रमानुसार करू शकतात, जसे 'तुझा कोट घे आणि घेऊन ये' गोष्टी ऐकायला आवडते |
| ३० महिन्यांपर्यंत | सातत्याने २ ते ३ शब्दांचे वाक्य बोलू शकतो<br>आत, बाहेर, वर' या शब्दांचा बोलण्यात प्रयोग करतो<br>घरातल्यांना त्याचे कमीतकमी ५०% बोलणे समजते | २ वेगवेगळ्या सूचनांचे पालन करते, जसे 'बॉल मला दे आणि तुझा कोट घेऊन ये'<br>मूल भूत नाम आणि सर्वनामांचे अर्थ समजतात<br>'तुझे, माझे' या संकल्पना समजतात |
| ३६ महिन्यांपर्यंत | काय आणि कुठे असे मूलभूत प्रश्न विचारतात<br>अनेकवचनी शब्द वापरतात<br>बोलण्यातला बराचसा भाग घरच्यांना समजतो | सर्वसाधारण वाक्यांचा अर्थ समजतो<br>रंग, जागा,वेळ अशा सोप्या संकल्पना समजू लागतात<br>'का' या प्रश्नाचा अर्थ कळतो |

Unnati Pediatric Rehabilitation Center, Warje, Pune Email- unnatiprc@gmail.com Contact- +91 9561879749

Unnati
PEDIATRIC REHABILITATION CENTER
Building Up Milestone

# तुमच्या मुलाला बोलायला प्रोत्साहित कसे कराल?

1. मोठ्या आवाजात आणि तालात बोला जेणेकरून बाळाचे लक्ष्य तुमच्याकडे जाईल.
2. बोलताना आवाजात चढउतार असू द्या, मजेदार, वेगवेगळे आवाज काढून खेळ खेळा.
3. ठराविक शब्दांसाठी चेहऱ्यावर वेगवेगळे भाव आणि हातवारे करत मुलाशी बोला
4. बाळाला कपडे घालताना, भरवताना, अंघोळ घालतानाच्या कृतींबद्धल बोलत राहा.
5. तुम्ही आणि तुमचे मूल एकमेकांशी बोलताना एकानंतर एकाने बोलायची पद्धत वापरा
6. तुमच्या मुलासोबत रंगीत चित्र असलेले, मोठ्या अक्षरात लिहिलेले असे पुस्तक वाचा, तसेच वाचत असताना त्याला चित्रातल्या वस्तूंची ओळख करून द्या आणि त्याला देखील वस्तू ओळखायला लावा
7. तुमच्या मुलाचा शब्दसंग्रह वाढवा. त्यासाठी त्याला माहिती असलेल्या शब्दांशी मिळतेजुळते दुसरे शब्द वापरवुन बोला.
8. तुमच्या मुलाच्या चुकलेल्या वाक्याची पुनर्रचना किंवा ते वाक्य वेगळ्या पद्धतीने बोलून दाखवा, ज्यामुळे त्याला उच्चार आणि व्याकरण शिकता येईल. उदाहरणार्थ, जर तो 'पेन लाल' असे म्हणत असेल तर त्याला 'हो, पेन लाल रंगाचे आहे' असे वाक्य बोलून दाखवावे

## Do's & Don'ts

**Do** let your child direct their play





**Do** play with your child in different ways

**Do** encourage playing with other children





**Do** ask your child questions

**Do** be silly!



Unnati Pediatric Rehabilitation Center, Warje, Pune Email- unnatiprc@gmail.com Contact- +91 9561879749